सी. ई. एस्. महाविद्यालय, कला आणि वाणिज्य महाविद्यालय,

कुंकळ्ळी – सासष्टी, गोवा

‘दर्पण’

वृत्तपत्रिका

शैक्षणिक वर्ष - २०२१-२२

फेब्रुवारी आणि मार्च, २०२२

खंड १, अंक ३

सहयोगी प्रा. चतुरा साकोर्डेकर
(संयोजिका, वृत्तपत्रिका)

डॉ. संजय सावंत देसाई
(प्राचार्य)

सहायक प्रा. शुभलक्ष्मी नाईक गांवकर
(संपादिका, मराठी विभाग)

संपादकांच्या खिडकीतून डोकावताना ...

प्रिय वाचकहो..

सी. ई. एस्. महाविद्यालयाच्या 'दर्पण' या मासिक e- वृत्तपत्रिकेचा तिसरा अंक आपल्यासमोर ठेवताना मला अत्यानंद होत आहे. या अंकात महाविद्यालयातील नानाविध उपक्रमांचे प्रतिबिंब उमटलेले असून सदर वृत्तपत्रिका आपल्या महाविद्यालयाचे एका अर्थी दर्पणच आहे असे वाटते !

सतत किलबिलत असणारे आपले महाविद्यालय प्रगतीच्या वाटेवर आपल्या पाऊलखुणा उमटवत आहे, याची ग्वाही या वृत्तपत्रिकेतून मिळते.

आम्ही आपल्या बहुमोल प्रतिक्रियेची वाट पाहत आहोत. चला तर आपल्या या प्रवासातील अनमोल क्षणांचे आपण साथीने साक्षीदार होऊया.

संपादिका:

सहायक प्रा. शुभलक्ष्मी नाईक गांवकर

मराठी विभाग

shubhlaxminaikgaonkar@cescollege.ac.in

१५ फेब्रुवारी, २०२२

सामुदायिक सेवा: मोरपिर्ला गावाला भेट

महाविद्यालयाच्या शिक्षकांनी आझादी का अमृत महोत्सवाअंतर्गत समाजसेवेचा एक भाग म्हणून मोरपिर्ला ह्या गावाला भेट दिली आणि साथीच्या काळात येणाऱ्या अडचणींबाबत गावकऱ्यांशी संवाद साधला. ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर मात करण्यासाठी उपाययोजना सुचविल्या. तसेच, प्राध्यापक सदस्यांनी कोविड १९ विरूद्ध प्रतिबंधात्मक उपायांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी मास्कचे वाटप देखील केले.

सामुदायिक सेवेत भाग घेतलेले शिक्षक.

मास्कचे वाटप करताना महाविद्यालयाचे शिक्षक.

१९ फेब्रुवारी, २०२२

शिवजयंती

महाविद्यालयाच्या इतिहास विभागाने शिवजयंतीच्या निमित्ताने सी. ई. एस्. संस्थेचे अध्यक्ष श्री. वीरेंद्र (विदेश) देसाई व प्राचार्य डॉ. संजय सावंत देसाई यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांची जयंती साजरी करण्यात आली.

शिवप्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना अध्यक्ष श्री. वीरेंद्र देसाई (विदेश) व प्राचार्य डॉ. संजय सावंत देसाई.

२० फेब्रुवारी, २०२२

निबंध लेखन स्पर्धा - "ग्राहक- आपले हक्क जाणून घ्या"

महाविद्यालयाच्या ग्राहक कल्याण कक्षाने नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार विभाग(DCSCA) यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राहक जागरूकता कार्यक्रमाचा एक भाग म्हणून "ग्राहक- आपले हक्क जाणून घ्या" या विषयावर निबंध लेखन स्पर्धा आयोजित केली होती. कु. तन्मयी नाईक (S.Y Bcom), कु. सबिता स्वेन (T.Y Bcom) आणि कु. रेखा ओली (T.Y Bcom) यांनी लिहिलेले सर्वोत्कृष्ट तीन निबंध नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार विभागा (DCSCA) कडे पाठवण्यात आले.

२७ फेब्रुवारी, २०२२

मराठी भाषा गौरव दिन

जागतिक मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून, मराठी विभागाने 'मराठी साहित्याच्या गावी' हा ऑनलाइन उपक्रम राबविला. मराठी भाषा गौरव दिनाविषयी माहिती, कवी कुसुमाग्रज यांची माहिती तसेच मराठी भाषा व साहित्य विषयक वेगवेगळे विडिओ, e-books इत्यादी विषयक माहिती विद्यार्थ्यांना व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमाद्वारे पाठवण्यात आली. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषा आणि साहित्य विषयक गोडी निर्माण होईल.

२८ फेब्रुवारी, २०२२

ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा : विज्ञान दिन

नोबेल पारितोषिक विजेते, शास्त्रज्ञ सी.व्ही.रमण यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ सी. ई. एस्. महाविद्यालयाच्या गणित व माहिती तंत्रज्ञान विभागाने विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल सामान्य ज्ञान रुजवण्यासाठी ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली होती.

५ मार्च, २०२२

व्याख्यान- भाषिक कौशल्ये आणि मराठी भाषेतून रोजगाराच्या संधी

मराठी विभागाच्या वतीने 'भाषिक कौशल्ये आणि मराठी भाषेतून रोजगाराच्या संधी' ह्या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानासाठी संसाधन व्यक्ती म्हणून गोवा विद्यापीठाच्या मराठी विभागातील सहायक प्रा. चिन्मय मधू घैसास यांना आमंत्रित करण्यात आले होत. मराठी भाषेतील नानाविध रोजगारांच्या संधीची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी ह्या हेतूने सदर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

६ मार्च, २०२२

निशुल्क नेत्र तपासणी शिबीर.

आझादी का अमृत मोहोत्सवाच्या अंतर्गत महाविद्यालयाने मोरपीर्ला येथील ग्रामपंचायतीत निशुल्क नेत्र तपासणी शिबीर आयोजित केले होते. साधारण ८५ लोकांना ह्या शिबिराचा लाभ झाला. तसेच ७६ लाभधारकांना निशुल्क चश्मा देण्यात आला. तर, ६ मोतिबिंदूचे रुग्ण आढळले.

नेत्रतपासणी करताना

कोहिनूर ऑप्टिक्सचे मालक श्री. आदेश कारवारकर वक्तव्य करताना.

८ मार्च, २०२२

♠ ***जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम***

महिला दिनाचे औचित्य साधून विद्यार्थी मंडळ आणि जेंडर चॅम्पियन अँड वुमेन्स सेल यांच्या वतीने महाविद्यालयाच्या सभागृहात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सहायक प्रा. सोकोरिना फर्नांडिस यांनी 'टाइमलाइन: वुमेन्स फूटप्रिंट इन हिस्ट्री' अर्थात इतिहासातील महिलांच्या पाऊलखुणा या विषयावर थोडक्यात माहिती करून दिली. तसेच एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात नामवंत महिलांच्या कार्याचे स्मरण करण्यासाठी फॅशन शोच्या रूपात त्यांच्या योगदानाचे चित्रण करण्यात आले होते. विद्यार्थिनींनी प्रेरणादायी भारतीय महिला व्यक्तिरेख्यांच्या वेशभूषा साकारल्या. महाविद्यालयातील महिला कर्मचाऱ्यांना प्राचार्यांच्या हस्ते फुलांचे रोपटे देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

महाविद्यालयातील महिला शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी.

भारतातील नामवंत महिलांची वेशभूषा साकारलेल्या विद्यार्थिनी.

♠ *महिला सक्षमीकरण सप्ताह.*

A Rally for Awareness on women empowerment and gender equality by NSS Unit

महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटने ८ ते १४ मार्च या कालावधीत 'महिला सक्षमीकरण सप्ताह' आयोजित केला होता. 'महिला सक्षमीकरण' या विषयावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महिला सक्षमीकरण या विषयावर रॅली, 'माय रोल मॉडल' या विषयावर निबंध, कोलाज तयार करण्याची स्पर्धा, घोषवाक्य लेखन आणि महिला सक्षमीकरण या विषयावर कविता लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

९ मार्च, २०२२

पोस्टर तयार करण्याची स्पर्धा

पोस्टर तयार करत असताना विद्यार्थिनी.

'आंतरराष्ट्रीय महिला दिना'चे औचित्य साधून राज्यशास्त्र विभागाने पोस्टर तयार करण्याची स्पर्धा आयोजित केली होती. सदर स्पर्धेची थीम 'लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरण' अशी होती. स्पर्धेत एकूण 8 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रथम क्रमांक मधु गुप्ता (TYBA), द्वितीय क्रमांक सोनम शर्मा (SYBA) आणि तृतीय क्रमांक दुर्गेश्वरी शिंदे (SYBA) ह्यांनी पटकवला.

१० मार्च, २०२२

व्याख्यान : Guest lecture: Metals in Human Body

डॉ प्रज्योती .गावंस देसाई यांचे स्वागत करताना विद्यार्थिनी ॲलोशा फर्नांडिस

विज्ञान व्याख्यानमालेचा एक भाग म्हणून सी.ई. एस्. महाविद्यालय आणि उच्च शिक्षण संचालनालय (DHE) यांच्या संयुक्त विद्यमाने 'मेटल्स ईन ह्यूमन बॉडी' अर्थात मानवी शरीरातील धातू ह्या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानासाठी डॉ. प्रज्योती गावंस देसाई यांना संसाधन व्यक्ती म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

१२ मार्च, २०२२

***व्याख्यान :* कर्करोग प्रतिबंधक उपाय आणि निरोगी जीवनशैली**

मार्गदर्शकां समवेत विद्यार्थी व शिक्षक.

महाविद्यालय आणि सजीवनी गैर सरकारी संघटना (NGO) यांनी एकत्ररित्या विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी 'कर्करोग प्रतिबंधक उपाय आणि निरोगी जीवनशैली' या विषयावर जनजागृती करण्यासाठी व्याख्यान आयोजित केले होते. कु. निषाद शेख आणि कु. डिंपल राजू यांना संसाधन व्यक्ती म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

१६ मार्च, २०२२

व्याख्यान: एव्हिएशन आणि हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीमध्ये रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन.

श्रीआनाथ शिवराज . मार्गदर्शन करत असताना.

वाणिज्य विभाग आणि करिअर आणि प्लेसमेंट सेलने तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'एव्हिएशन आणि हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीमध्ये रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन' या विषयावर व्याख्यान आयोजन केले होते. सदर व्याख्यानासाठी ग्रीफोन अकॅडेमीचे श्री. आनाथ शिवराज यांना मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

.

२१ मार्च, २०२१

♠ ***कविता वाचन स्पर्धा***

'जागतिक कविता दिनाच्या' दिवशी हिंदी विभागाने कविता वाचन स्पर्धा आयोजित केली होती. ज्यात एकूण १६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

♠ ***काव्य वाचन मैफिल***

'जागतिक कविता दिनाचे औचित्य साधून इंग्रजी विभगाने बहुभाषिक कविता वाचन मैफिल आयोजित केली होती. ज्यात विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या कविता वाचून दाखवल्या. एकूण २० विद्यार्थ्यांनी ह्या उपक्रमात सहभाग घेतला व 'शांती' ह्या विषयावर कविता सादर केल्या.

♠ पाच दिवसीय कार्यशाळा - व्यक्तिमत्त्व विकास



THE CUNCOLIM EDUCATIONAL SOCIETY'S
COLLEGE OF ARTS AND COMMERCE
Cuncolim- Salcete Goa

Student's Council
Organizing
Five Day Personality Development Workshop (21st to 28th March 2022)

Date	Topic	Resource person
21st March, 2022 2.00 to 4.00 pm	Motivation and Positive thinking	Mr.Pravin Sabnis (Corporate Trainer)
23rd March, 2022 2.00 to 4.00 pm	Personal Grooming and Self-awareness	Mr. Ragunath Sancordekar (Ex-Bank Manager BOI & Stage Actor)
24th March, 2022 2.00 to 4.00 pm	Development of Personal Traits	Mr. Tilroy Fernandes (Ex- Principal of C.U.H.S.S. & Career Counsellor)
25th March, 2022 2.00 to 4.00 pm	Etiquette and Communication Skills	Dr. Jorson Fernandes (ENT, Surgeon & Corporate Trainer)
28th March, 2022 2.00 to 4.00 pm	Presentation Skills and Self Introduction	Mr. Avin Naik (Soft Skill Trainer)

Dr. Suraj M. Popker (Convenor, Students' Council) | Mrs. Tina De Santa Tereza (Coordinator) | Mrs.Ashvini Chari (Co-coordinator) | Dr. Sanjay Sawant Dessai (Principal)

महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेने 21, 23, 24, 25 आणि 28 मार्च रोजी विद्यार्थ्यांचे सॉफ्ट स्किल्स आणि व्यक्तिमत्त्व विकास घडवण्याच्या उद्देशाने व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर पाच दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. ह्यात पाहुणे वक्ते म्हणून विविध क्षेत्रातील पाच मान्यवर वक्त्यांना आमंत्रित करण्यात आले होते. पहिल्या सत्रासाठी श्री प्रवीण सबनीस, (कॉर्पोरेट ट्रेनर) यांनी 'प्रेरणा आणि सकारात्मक विचार' या विषयावर मार्गदर्शन केले. तर, दुसऱ्या सत्रात श्री रघुनाथ साकोर्डेकर, (माजी बँक व्यवस्थापक बीओआय आणि रंगमंच अभिनेते), ह्यांनी 'पर्सनल ग्रूमिंग आणि सेल्फ अवेअरनेस' ह्या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रासाठी श्री टिलरॉय फर्नांडिस (माजी प्राचार्य, C.U.H.S.S.) लाभले होते त्यांनी 'वैयक्तिक वैशिष्ट्यांचा विकास' या विषयावर, चौथ्या सत्रात डॉ. जोर्सन फर्नांडिस (ईएनटी सर्जन) यांनी 'शिष्टाचार आणि संवाद कौशल्ये' या विषयावर आणि शेवटच्या दिवशी श्री. अवीन नाईक (सॉफ्ट ट्रेनर) यांनी 'प्रेझेंटेशन स्किल्स आणि सेल्फ इंट्रोडक्शन' या विषयावर मार्गदर्शन केले. एकूण 60 विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचा लाभ घेतला.

२६ मार्च, २०२२

♠ मराठी विभागाच्या सहायक प्रा. शुभलक्ष्मी नाईक गांवकर यांना मार्गदर्शक म्हणून एक दिवसीय सूत्रसंचालन कार्यशाळेसाठी आमंत्रित करण्यात आले होते. सदर कार्यशाळा

समाज सेवा संघटना, मळकर्णेचे आराधना ग्रामीण वाचनालय आणि गोवा मराठी अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने सरकारी माध्यमिक विद्यालय मळकर्णे, सांगे येथे घेण्यात आली होती.

♠

वार्षिक क्रीडा दिवस

शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागाने वार्षिक क्रीडा दिनाचे आयोजन कुंकळ्ळी येथील एस.ए. जी. फुटबॉल ग्राउंडवर केले होते. पुरुष आणि महिला गटासाठी पुढील स्पर्धा आयोजित करण्यात आल्या: ट्रॅकवरील खेळ - 100 मी, 200 मी, 400 मी, 4*400 रिले. फील्ड वरील खेळ - भालाफेक, डिस्कस फेक, शॉट पुट आणि लांब उडी. विशेष कार्यक्रम- मार्च पास्ट आणि रस्सी खेच अशा खेळांचेही आयोजन करण्यात आले होते.

वार्षिक क्रीडा दिनाची छायाचित्रे.

३० मार्च, २०२२

व्याख्यान : करिअर विषयक मार्गदर्शन

सहायक प्रा. सायली तेंडोलकर मार्गदर्शन करत असताना.

वाणिज्य विभाग व करिअर आणि प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'करिअर मार्गदर्शन' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. कार्मेल कॉलेज नुवें येथील सहायक प्राध्यापिका सायली तेंडोलकर यांनी वाणिज्य पदवीधरांसाठी करिअरच्या संधींविषयी माहिती दिली.

३० मार्च, २०२२

रक्तदान शिबिर

आझादी का अमृत महोत्सवानिमित्त, समाजसेवेचा एक भाग म्हणून महाविद्यालयातील एन. एस. एस. युनिट व गोवा वैद्यकीय महाविद्यालय, बांबोळी, गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सभागृहात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सी. ई. एस्. महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यार्थी यांच्यासह कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि स्थानिक ग्रामस्थांनी रक्तदान केले. एकूण 85 स्वयंसेवकांपैकी 50 स्वयंसेवक रक्तदानासाठी पात्र ठरले व एकूण 50 युनिट रक्तदान करण्यात आले.

रक्तदान करताना स्वयंसेवक

३१ मार्च, २०२२

आंतरवर्गीय निबंध लेखन स्पर्धा

कोंकणी विभागाने पुढील विषयांवर आंतरवर्गीय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केले. विषय: 'पुस्तक आमचो इश्ट', 'म्हका आवडील्लें पुस्तक', 'संपर्क माध्यमां वाचनाचेर परिणाम करता काय?' . ह्या स्पर्धेत एकूण ११ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३१ मार्च, २०२२

आंतर महाविद्यालयीन स्पर्धा- पोलीटोरिया

राज्यशास्त्र आणि इतिहास विभागातर्फे 'पोलिटोरिया' ही आंतर महाविद्यालयीन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यभरातील एकूण 9 महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. ह्या इव्हेंटमध्ये 4 स्टेजवर आणि 3 ऑफ स्टेज स्पर्धांचा समावेश होता. प्रथम क्रमांक पी.ई.एस. महाविद्यालय, फोंडा, द्वितीय क्रमांक शासकीय महाविद्यालय, केपे, आणि तृतीय क्रमांक कार्मेल महिलांचे महाविद्यालय, नुवें यांनी पटकवला.

'पोलीटोरिया' स्पर्धेचे विजेते, प्राचार्य, शिक्षक व इतर विद्यार्थ्यांसमवेत.

♦♦♦♦♦